ODCC Bank.

**महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८३ खालील आदेश**

२६४१ **जा.क्र.प्रशासन/उ,बादजिमसबँक/क.८३/चौ/सन११,**

कार्यालय विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था,

लातूर, दिनांक :- २२ /११/२०११

**वाचा:-** महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८३ व नियम ७१

**वाचले :-** १.श्री.राहूल काकासाहेब पाटील व सुरेश बिराजदार , संचालक,उस्मानाबाद जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.उस्मानाबाद यांचा तक्रार अर्ज दि.३१/१०/११

२.जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,उस्मानाबाद यांचे पत्र जा.क्र.वि-१/जिमस/ सं.मं. सभा/वि/२०११, दि.८/११/११

३.श्री.राहूल मोटे व इतर २ संचालक, उस्मानाबाद जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.उस्मानाबाद यांचा तक्रार अर्ज दि.१६/११/११

४.सहकार,पणन व वस्त्रोद्योग विभाग यांचे पत्र जा.क्र.जिमस-२०११/प्र.क्र.१२५९/ २-स, दि.१६/११/२०११

५.मा.सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था,महाराष्ट्र राज्य पुणे यांचे अ.शा. पत्र क्र.अर्थ/वशो/उस्मानाबादजिमस/तेरणाससाका/११,दि.२१/११/११

ज्याअर्थी, उस्मानाबाद जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.उस्मानाबाद ही महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० अन्वये नोंदणीकृत बँक असून सदरची बँक या कार्यालयाचे अधिकारकक्षेत येते. आणि,

ज्याअर्थी, संदर्भ क्र. १ ते ३ अन्वये उस्मानाबाद जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.उस्मानाबाद या बँकेने केलेल्या कर्जवाटप प्रकरणी बँक ही बँकींग रेग्यूलेशन अॅक्ट चे कलम ११ मध्ये असल्यामुळे शासनाची थकहमी नसतांना, बँकेच्या कर्जाच्या सुरक्षेसाठी तारण न घेता तसेच कर्जदारांची उचल व परतफेडीची क्षमता याचा कोणताही विचार न करता बीगरशेती कर्जवाटप केले असल्याचे या कार्यालयाचे निदर्शनास आले आहे.

ज्याअर्थी, बँकेच्या संचालक मंडळाने/बँकेच्या अधिका-यांनी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६०, नियम १९६१ तसेच बँकींग रेग्यूलेशन अॅक्ट १९४९ चे उल्लंघन करुन मोठ्या प्रमाणात कर्जव्यवहारातील आर्थिक अनियमीतता केल्यामुळे बँकेच्या व्यवहारामध्ये आर्थीक नुकसान झाले असल्यास त्याबाबतची निश्चिती करण्यांसाठी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८३ अन्वये चौकशी अधिकारी नियुक्त करुन चौकशी करुन नुकसानीची निश्चीती करणे आवश्यक असल्यामुळे खालील प्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८३ अन्वये प्रदान करण्यांत आलेल्या अधिकाराचा वापर करुन मी, श्रीकृष्ण आ.वाडेकर, विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, लातूर उस्मानाबद जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.उस्मानाबाद या बँकेच्या संबंधीत संचालक मंडळ,पदाधिकारी व अधिकारी/कर्मचारी यांनी केलेल्या कर्जवाटप प्रकरणांत आणि बँकेच्या आर्थिक अनियमितते बाबत बँकेचे आर्थिक नुकसान किती झाले त्या बाबतची निश्चिती करण्यांसाठी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८३ मधील तरतुदीनुसार चौकशी करण्यांत यावी असे मी आदेश देत आहे.

सदर चौकशीसाठी श्री.बी.एस.जाधव,जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,बीड यांची चौकशी अधिकारी म्हणून नेमणूक करीत आहे. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० आणि त्याखालील

नियमानुसार चौकशी करुन सोबतच्या परिशिष्ट अ मध्ये नमुद केलेल्या व्यवहारात बँकेला आर्थिक नुकसान झाले आहे किंवा कसे याची चौकशी करुन नुकसान झाले असल्यास ते किती रक्कमचे झालेले आहे त्याची निश्चिती करुन आवश्यक तो अहवाल सादर करावा.

सदर चौकशी अधिकारी यांनी त्यांचा अहवाल सदर आदेशाच्या दिनांकापासून ३ महिन्याच्या आत या कार्यालयास सादर करावा. सदर वैधानिक चौकशीसाठी लागणारी स्टेश्नरी,पोस्टेज व इतर अनुषंगीक खर्च बँकेकडून परस्पर भागविण्यांत यावा.

चौकशी अधिका-याचे मानधना बाबतचे आदेश अलहिदा निर्गमीत करण्यांत येतील.

सदरील आदेश आज दिनांक- २२/११/२०११ रोजी माझ्या सही शिक्क्यानिशी निर्गमीत केली असे.

(श्रीकृष्ण आ.वाडेकर)
विभागीय सहनिबंधक,
सहकारी संस्था, लातूर

प्रति,१.श्री.बी.एस.जाधव,जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,बीड तथा चौकशी अधिकारी यांना देवून सुचित करण्यांत येते कि, त्यांनी आदेशा सोबत जोडलेल्या परिशिष्टा मधील प्रत्येक मुद्यावर कलम ८३ अंतर्गत चौकशी करुन अहवाल विहीत मुदतीत सादर करावा. या मुद्या व्यतिरिक्त अन्य आक्षेपार्ह बाबी आढळून आल्यास त्याबाबतचा अहवाल स्वतंत्ररित्या करण्यांत यावा.

२.मुख्य कार्यकारी अधिकारी, उस्मानाबाद जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.उस्मानाबाद

३.जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, उस्मानाबाद

४.कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि.मुंबई-३२

**प्रत माहितीस्तव सविनय सादर.**

१.मा.प्रधान सचिव(सहकार),सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय,मुंबई३२

२.मा.सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था,महाराष्ट्र राज्य पुणे-१

**प्रत माहितीस्तव**

१.श्री.राहूल काकासाहेब पाटील, संचालक, उस्मानाबाद जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.उस्मानाबाद

२.श्री.सुरेश बिराजदार, संचालक, उस्मानाबाद जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.उस्मानाबाद

३.श्री.राहूल मोटे, संचालक, उस्मानाबाद जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.उस्मानाबाद

४.श्री.पंडीतराव टेकाळे, संचालक, उस्मानाबाद जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.उस्मानाबाद

विभागीय सहनिबंधक,
सहकारी संस्था, लातूर

ODCC Bank.

परिशिष्ट-अ

उस्मानाबाद जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.उस्मानाबाद कलम ८३ खालील चौकशीचे मुद्दे

**१.तेरणा शेतकरी सहकारी साखर कारखाना म.ढोकी या कारखान्यास खालील प्रमाणे कर्जवाटप केले आहे.**

१.कारखान्याने पुर्व हंगामी तोडणी वाहतूक ॲडव्हान्स,मश्नरी निगा व दुरुस्ती,कर्मचारी पगार,विज बील व प्रशासकिय खर्च या कारणांसाठी कर्ज-दि.१/८/११ रोजी मागणी रु.३४०० लाख,

२.अल्प मुदती ऊस तोडणी वाहतूक यंत्रणा उभी करण्यासाठी कर्ज- दि.१२/९/११ रोजी मागणी रु.१००० लाख,

३.औद्योगीक मंडळ व ग्रामीण करागीर योजना सभा दिनांक २४/१०/११ चा ठराव क्र.१ नुसार कारखान्यास रु.९.०० कोटी अल्पमुदत कर्ज मंजूर करण्यांत आले.

४.मंजूर कर्ज उचलने बाबतचा प्रस्ताव कारखान्याने दि.३१/१०/११ रोजी दाखल केला.

५.बँकेने दि.३१/१०/११ रोजी ५० टक्के या प्रमाणे उचल मंजूर केली.

बँकेने कर्ज मंजूर करताना बँकेची सदर कर्ज मंजूर प्रकरणी कारखान्याची पत न पाहता व कर्ज मंजूरी नंतर बँकेच्या आर्थीक स्थितीवर होणारा विपरीत परीणाम यांचा विचार न करता तसेच बँक बँकींग रेग्यूलेशन ॲक्ट १९४९ चे कलम ११ खाली असल्यामुळे व शासनाची थकहमी नसताना बिगरशेती कर्ज पुरवठा करता येत नांही. असे असतांना बँकेने कर्ज पुरवठा केला आहे.

विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था लातूर
सत्यमेव जयते
लातूर

**विभागीय सहनिबंधक,**
**सहकारी संस्था, लातूर**